DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE
ICHALKARANJI
ICHALKARANJI

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६

मराठी विभाग बैठक

Scanned with OKEN Scanner

सत्र -१

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "

- शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI

## पदवी व पदव्युत्तर विभाग

Academic Year 2025 – 2026

दिनांक :- ०१/०७/२०२५

## सूचना

मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापकांना कळविण्यात येते कि, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र एकची विभागातील कामकाज विभागणीचे नियोजन करण्यासंदर्भात मंगळवार दिनांक ०१/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मराठी विभागात बैठक आयोजित केली आहे .तरी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी बैठकीला वेळेवर उपस्थित रहावे .

## बैठकीतील विषय

१ ) शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मधील सत्र एकचा कार्यभार विभागणी करणे .

२ ) मराठी विभागाचे वार्षिक उपक्रमांचे अॅकॅडेमिक कॅलेन्डर तयार करणे .

३ ) ब्रीज कोर्सचे नियोजन करणे.

४ ) शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ मधील सत्र एकमधील राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचे नियोजन करणे.

५ ) 'मुद्रितशोधन' COC प्रमाणपत्र कोर्स घेणेविषयी चर्चा करणे.

६ ) सामंजस्य व अनुबंध करारांतर्गत विविध उपक्रम राबवणे.

७ ) मराठी विभागाचा ब्लॉग अपडेट करणे.

८) घेतलेल्या कार्यक्रमांचे व ऐनवेळी होणा-या कार्यक्रमांचे कागदपत्रे (रेकॉर्ड) तयार करणे.

९) मराठी विभागाच्या वेबसाईटचे कामकाज पूर्ण करणेबाबत चर्चा करणे.

१०) माजी विद्यार्थी - विद्यार्थिनी मेळावा घेणेविषयी चर्चा करणे .

११) ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे .

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के.खाडे
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

१ ) श्रीमती भारती कोळेकर

२) श्री. रोहित शिंगे

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

# इतिवृत्त लेखन.

## शैक्षणिक वर्ष - २०२५-२६

### सत्र - १ (पहिले)

दि. :- १/७/२०२५ मंगळवार

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील सत्र १ ची मराठी विभागाची बैठक मंगळवार दिनांक १/७/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मराठी विभागात संपन्न झाली. या बैठकीत मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते. या वेळी नोटीसमधील सर्व विषयावर सविस्तर चर्चा होऊन कामकाज करण्याविषयी सर्वानुमते कामकाज करण्यात आले.

विषय १ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ सत्र १ मधील कार्यभार विभागणी करणे.

ठराव शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र १ चा B.A भाग १, २, ३ आणि B.Com., BSc. भाग १ (OE) या वर्गांच्या अभ्यासपत्रिकानिहाय दिलेला अभ्यासक्रम पुढील प्रमाणे विभागणी करण्यात आला

१) प्रो. (डॉ.) सुभाष म. जाधव :- B.A. भाग २. अभ्यासपत्रिका क्रमांक ३ व ५ B.A. भाग ३ अभ्यासपत्रिका क्रमांक ९, १० आणि १३, १४, १५ पूर्ण अभ्यासपत्रिका घेणे

२) श्रीमती भारती श्री. कोळेकर :- B.A. भाग १ (SEC), B.Com & B.Sc. भाग १ (OE), B.A. भाग २ मेजर पेपर IV व मायनर पेपर घ. ३ व ४ (२ घटक), B.A भाग ३ पेपर VII या अभ्यासपत्रिका शिकवून पूर्ण करणे.

३) श्री रोहित प्र. शिंगे :- B.A भाग १ (DSC), B.A. भाग २ मायनर पेपर घटक १ व २ (२ घटक), B.A. भाग २ SEC आणि OE, बी.ए. भाग ३ पेपर क्रमांक ११ व १६ शिकवून पूर्ण करणे आहे.

वरीलप्रमाणे सर्वानुमते चर्चा करून अभ्यासक्रम शिकवून पूर्ण करण्याचे ठरले.

विषय २ मराठी विभागाचे वार्षिक उपक्रमांचे ॲकॅडेमिक कॅलेंडर तयार करणे

ठराव शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाविषयी चर्चा करण्यात आली. सदरच्या सर्व उपक्रमांचा कच्चा मसुदा तयार करून मा. प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खोत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम घेण्याचे ठरले. व सर्व मसुदा अंतिम (कायम) करण्यात आला.

विषय ३ ब्रीज कोर्सचे नियोजन करणे

ठराव. बी.ए. भाग १ साठी ब्रीज कोर्स घेण्याचे ठरले. हा कोर्स

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE
CODE : GEN...
ICHALKARANJI

मंगळवार दिनांक १/७/२०२५ ते गुरुवार दिनांक १७/७/२०२५ या कालावधीत घेण्याचे ठरले.

विषय ४ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र १ मधील राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे नियोजन करणे.

ठराव. सूचनेमधील विषयपत्रिका क्रमांक २ नुसार कार्यक्रम घेण्याचे ठरले. कार्यक्रम घेत असताना विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी सक्रीय सहभाग घेऊन कार्यक्रम उत्तमपद्धतीने संपन्न करावे असे सर्वानुमते ठरले. उपक्रम घेत असताना B.A. व M.A च्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतील असे उपक्रम घेण्याचे ठरले.

विषय ५ मुद्रितशोधन COC प्रमाणपत्र कोर्स घेणेविषयी चर्चा करणे.

ठराव मुद्रितशोधन हा कोर्स B.A. भाग २ च्या विद्यार्थ्यांसाठी COC (Career Oriented Course) कोर्स घेण्याचे ठरले. सदरचा कोर्स दि. शुक्रवार दिनांक १/८/२०२५ ते शनिवार दि. २७/९/२०२५ या कालावधीत ३० तासांचा पूर्ण करणे असे सर्वानुमते ठरले.

विषय ६ सामंजस्य व अनुबंध करारांतर्गत विविध उपक्रम राबविणे.

ठराव सामंजस्य व अनुबंध करारांतर्गत समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी यांच्याशी ग्रंथालय भेट व वृत्तपत्र पत्रलेखन कार्यशाळा घेण्यात यावी. दमसा. बरोबर मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त व्याख्यान घेण्यात यावे. शिविम. सोबत मराठी भाषा दिन घेण्यात यावा व श्रीमती आ.रा. पाटील कन्या महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय ७ मराठी विभागाचा ब्लॉग अपडेट करणे. (जून २०२४-२५ वर्ष)

ठराव मराठी विभागाचा ब्लॉग अपडेट करणे महत्वाचे असल्याने सदरचे कामकाज प्रो. (डॉ.) सुभाष जाधव यांनी पूर्ण करण्याचे ठरले.

विषय ८ विभागांतर्गत घेतलेल्या कार्यक्रमांचे व एनवेळी होणाऱ्या कार्यक्रमांचे कागदपत्रे (रेकॉर्ड) तयार करणे.

ठराव. विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमाची कागदपत्रे सत्र १ मधील श्री रोहित शिंगे यांनी तयार करण्याचे ठरले. तर सत्र २ मधील सर्व कागदपत्रे श्रीमती भारती कोळेकर यांनी तयार करण्याचे ठरले.

| | |
|---|---|
| विषय ९ | मराठी विभागाच्या वेबसाईटचे कामकाज पूर्ण करणेबाबत चर्चा करणे. |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील घेतलेल्या सर्व उपक्रमांचे रेकॉर्ड मराठी विभागाच्या वेबसाईटला प्रो.(डॉ.) सुभाष जाधव यांनी पूर्ण करण्याचे ठरले. |
| विषय १० | माजी विद्यार्थी विद्यार्थिनी मेळावा घेणेविषयी चर्चा करणे. |
| ठराव. | मराठी विभागातील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींना मेळावा सत्र २ मध्ये घेण्यात यावा. अंदाजे |
| विषय ११ | ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विद्यापीठ परिपत्रक क्र. शिवाजी विद्या/संलग्नता टी.१/१०५३ दि. १४ July २०२५ नुसार व संस्था परिपत्रक जावक क्र. अमावि/४०२३ दि. 1 AUG. 2025 नुसार एम.ए. साठी स्वतंत्र फॅकल्टी नियुक्त करणेविषयी कळविण्यात आले होते. त्यानुसार सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. प्राचार्य प्रो.डॉ. एस.के. खाडे यांचे मार्गदर्शनाखाली एम.ए. ची शिक्षक नियुक्ती संस्थेला कळविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. |

वरील प्रमाणे सर्व विषयावर सविस्तर चर्चा करून सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले. या प्रसंगी मराठी विभागातील पुढील सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते.

१) श्रीमती भारती श्रीधर कोळेकर – [signature]

२) श्री रोहित प्रकाश शिंगे – [signature]

[signature]

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव

प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

[signature]

प्रो.(डॉ.) एस.के. खाडे

प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

सत्र - २ -

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार"
शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI

Academic Year 2025 – 2026

दिनांक :- १/११/२०२५

## नोटीस

मराठी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र दोनची बैठक मराठी विभागात सोमवार दिनांक ३/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केली आहे. सदर बैठकीत कामकाज विभागणीचे नियोजन करण्यासंदर्भात पुढील विषयावर चर्चा करून निर्णय घ्यायचे आहेत. तरी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी बैठकीला वेळेवर उपस्थित रहावे .

### बैठकीतील विषय

१ ) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र दोनच्या बी.ए. १, २ व ३.वर्गांचा अभ्यापत्रिकानुसार कार्यभार विभागणी करणे .
२ ) सामंजस्य करारांतर्गत समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी यांचे सोबत वृतपत्र पत्रलेखन कार्यशाळा घेणे विषयी चर्चा करणे.
३ ) सामंजस्य करारांतर्गत श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथील ग्रंथालयास अभ्यास भेटी देणे अथवा व्याख्यान आयोजित करणे.
४ ) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घ्यायच्या उपक्रमाविषयी चर्चा करणे .
५ ) मराठी भाषा गौरव दिन साजरा करणे.
६ ) शैक्षणिक सहलीचे नियोजन करणे.
७ ) नेट सेट कार्यशाळा घेणेविषयी चर्चा करणे.
८ ) शैक्षणिक वर्ष २०२४ -२५ मधील सत्र दोनमधील राबविण्यात येणा-या कार्यक्रमाचे रेकोर्ड करणेविषयी चर्चा करणे.
९ ) संशोधन या विषयावर कार्यशाळा घेणेविषयी चर्चा करणे.
१०)ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे .

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के.खाडे
Principal,
D.K.A.S.C. College
Ichalkaranji.

१ ) श्रीमती भारती कोळेकर
२) श्री. रोहित शिंगे

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

विभाग बैठक इतिवृत्त लेखन सत्र - दोन.

दिनांक - ३/११/२०२५
वार - सोमवार.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र २ (दोन) ची मराठी विभाग बैठक सोमवार दिनांक ३/११/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मराठी विभागात संपन्न झाली. सूचनेमध्ये दिलेल्या विषयावर सविस्तर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव करण्यात आले.

विषय १ सत्र दोनच्या अभ्यासपत्रिकेनुसार कार्यभार विभागणी करणे.

ठराव. सत्र एक (१) मध्ये विभाग बैठकीतील विषय क्रमांक १ मध्ये ठराव केले प्रमाणे सर्व अभ्यासपत्रिकांचा कार्यभार पूर्ण करावयाचा आहे. असे सर्वानुमते ठरले.

विषय २. सामंजस्य करारांतर्गत कार्यशाळा घेणेविषयी चर्चा करणे.

ठराव. समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी यांचेशी झालेल्या सामंजस्य करारांतर्गत पत्रकार दिनानिमित्त कार्यशाळा (६/८ जानेवारी) घेण्यात यावी. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा यांचेशी झालेल्या सामंजस्य करारांतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या सहयोगाने २८ फेब्रुवारी २०२६ ला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करावे असे सर्वानुमते ठरले.

विषय ३ लिंकेजेस करारांतर्गत श्रीमती. आ.रा. पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी. येथील ग्रंथालयास अभ्यासभेट देणे अथवा व्याख्यानाचे आयोजन करणे विषयी चर्चा करणे.

ठराव. अनुबंध करारांतर्गत श्रीमती आ.रा. पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथील ग्रंथालयास अभ्यासभेट देण्यात यावी. ही अभ्यासभेट जानेवारी २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यात घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय ४ मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्ताने उपक्रम घेणेविषयी चर्चा करणे.

ठराव १४ जानेवारी ते २८ जानेवारी या दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्या सहयोगाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

यावे. सदरचे व्याख्यान दमसाच्या कार्यकारणीतील कार्याध्यक्ष अथवा अध्यक्ष यांचेशी चर्चा करून ठरविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय ५ मराठी भाषा गौरव दिन साजरा करणे.
ठराव मराठी भाषा गौरव दिन प्रसंगी व्याख्यानाचे आयोजन करणे सदरचे व्याख्यान शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर यांच्या सहयोगाने घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

विषय ६ शैक्षणिक सहलीचे नियोजन करणे.
ठराव. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे शैक्षणिक सहल बी.ए. भाग २,३ आणि एम.ए. भाग १,२ यांची संयुक्तिकरित्या काढावी असे सर्वानुमते ठरले.

विषय ७ नेट-सेट कार्यशाळा घेणे विषयी चर्चा करणे.
ठराव. मराठी विभागामार्फत डिसेंबर २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात कार्यशाळेचे आयोजन करावे. नेट-सेट कार्यशाळा दोन सत्रात आयोजित करावी असे सर्वानुमते ठरले.

विषय ८ सत्र दोनमधील होणाऱ्या कार्यक्रमाचे रेकॉर्ड तयार करणे.
ठराव- सत्र दोनमध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे रेकॉर्ड कार्यक्रम संपन्न होताच ज्या त्या वेळी पूर्ण करण्यात यावे. असे सर्वानुमते ठरले.

विषय ९ संशोधन या विषयावर कार्यशाळा घेणेविषयी चर्चा करणे.
ठराव. बी.ए. ३ व एम.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन या विषयावर डिसेंबर महिन्यात शेवटी कार्यशाळा घेण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय १० ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे
ठराव ऐनवेळी कोणताही विषय चर्चेसाठी आला नाही

वरील प्रमाणे सर्व विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व ठराव सर्वानुमते करण्यात आले. ठरावांना सर्वांनी संमति दिली. याप्रसंगी विभागातील इतर सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते. ते पुढील प्रमाणे आहेत

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

१) श्रीमती भारती श्रीधर कोळेकर

२) श्री रोहित प्रकाश शिंगे.

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव

**प्रमुख**
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस. के. खोत.

**Principal,**
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

सत्र समाप्ती बैठक

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE
CODE : GEN
ICHALKARANJI

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "
शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI

Academic Year 2025 – 2026

दिनांक :- १८/०४/२०२६

## नोटीस

मराठी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सत्र समाप्ती बैठक मराठी विभागात मंगळवार दिनांक २१/०४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केली आहे. सदर बैठकीत सत्रारंभ बैठकीत ठरलेनुसार आणि कामकाज विभागणीचे नियोजन केलेनुसार व महाविद्यालयातील **IQAC** कमिटीने सांगितलेल्या सुचना नुसार कागदपत्रे त्रुटींची पूर्तता करणे विषयी चर्चा करून निर्णय घ्यायचे आहेत. तरी विभागातील सर्व सहाय्यक प्राध्यापकांनी बैठकीला वेळेवर उपस्थित रहावे.

### बैठकीतील विषय

१ ) मराठी विभागांतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रमांची कागदपत्रे तयार केली आहेत काय याविषयी चर्चा करणे.

२ ) महाविद्यालयातील **IQAC** कमिटीने सांगितलेल्या सुचना नुसार कागदपत्रे त्रुटींची पूर्तता करणेविषयी चर्चा करणे .

३ ) ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे .

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के.खाडे
PRINCIPAL
Dattajirao Kadam A. S. C. College
Ichalkaranji

१ ) श्रीमती भारती कोळेकर

२) श्री. रोहित शिंगे

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE
ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE
ICHALKARANJI
ICHALKARANJI

सत्र समाप्ती बैठक शैक्षणिक वर्ष २०२५-२६

मंगळवार, दि. २१/४/२०२६

बैठक इतिवृत्त लेखन.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची वर्ष समाप्ती बैठक मराठी विभागात मंगळवार दि. २१/४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. या बैठकीत सूचनेमध्ये दिलेल्या विषयावर सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

विषय १ | मराठी विभागांतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रमांची कागदपत्रांची पूर्तता झाली आहे काय याविषयी चर्चा करणे.

ठराव:- विभागांतर्गत घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांची कागदपत्रे तयार करण्यात आली आहेत. मात्र महाविद्यालयातील IQAC कमिटीने तयार केलेल्या रेकॉर्डमध्ये काही सूचना सांगितल्या त्यानुसार राहिलेले सर्व रेकॉर्ड विभागातील सर्व प्राध्यापकांनी विभागाशी करून पूर्ण करण्याचे ठरले. सदर रेकॉर्ड सत्र समाप्तीपूर्वी म्हणजेच बुधवार दिनांक २२/४/२०२६ पर्यंत मराठी विभागात पूर्ण करून जमा करण्याचे सर्वानुमते ठरले.

विषय २ | महाविद्यालयातील IQAC कमिटीने सांगितलेल्या सूचनानुसार कागदपत्रांची त्रुटींची पूर्तता करणे विषयी चर्चा करणे.

ठराव: विषय क्रमांक १ मध्ये ठरल्याप्रमाणे बुधवार दि. २२/४/२०२६ पर्यंत रेकॉर्ड पूर्ण करून मराठी विभागात जमा करणे. काही तांत्रिक अडचणी आल्यास सदर रेकॉर्ड मंगळवार दिनांक ५/५/२०२६ अखेर विभागात जमा करावे असे सर्वानुमते ठरले.

विषय ३ | ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठराव. यू ट्यूब चॅनल (मराठी विभागाचे) अपडेट करणे विषयी चर्चा झाली. या वेळी यू ट्यूब चॅनलवर व्हिडिओ अपलोड करणे आणि विभागाच्या सर्व कार्यक्रमांचे इन्स्टाग्राम आणि फेसबुकवर अपलोड करण्याची जबाबदारी श्री रोहित शिंगे यांचेकडे देण्यात आली. वेळेचे नियोजन करून माहिती अपलोड केली जाईल असे श्री रोहित शिंगे यांनी मान्य केले व लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात येईल असे सांगितले.

वरील सर्व विषयावर सविस्तर चर्चा करून

Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

ठराव सर्वानुमते पास करण्यात आले. ठरलेल्या ठरावानुसार सर्वांनी वेळेत कामकाज पूर्ण करण्यात येईल. असे सांगत बैठक समाप्त करण्यात आली. याप्रसंगी विभागातील सहाय्यक प्राध्यापक पुढील प्रमाणे उपस्थित होते.

1) श्रीमती भारती अशोक कोळेकर
   सहाय्यक प्राध्यापक
2) श्री रोहित प्रकाश शिंगे
   सहाय्यक प्राध्यापक

प्रो. (डॉ.) सुभाष जाधव
**प्रमुख**
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी. कॉलेज
इचलकरंजी

प्रो. (डॉ.) एस. के. खाडे
Principal
D.K.A.S.C. College
Ichalkaranji

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI